# भारतातील पाश्चात्य शिक्षणाचा विस्तार आणि त्याचे भारतीय जनमाणसावर झालेले परिणाम

**प्रा. नरेंद्र विश्वनाथ झाडे**
श्री गोविंदराव कला, वाणिज्य महाविद्यालय,
तळोधी (बाळापूर), ता. नागभीड, जि. चंद्रपूर
भ्र. क्र. ९९२३९८७८२१

---

**प्रस्तावना :**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य भारतात स्थापन झाल्यावर तिच्यासमोर एक फार मोठी समस्या निर्माण झाली. ती म्हणजे भारतीय भाषांबद्दल असलेले अज्ञान. यातूनच भारतीयांना शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे असा इंग्रज सरकारने विचार केला. इंग्रजी शिक्षणामुळे इंग्रजांना आवश्यक असणारा प्रशासक वर्ग निर्माण होईल अशी अपेक्षा होती. हा वर्ग इंग्लंडमधील औद्योगिक उत्पादनाचा उपभोक्ता बनेल अशी इंग्रज अधिकाऱ्यांची अपेक्षा होती. या इंग्रजी शिक्षणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती. प्राथमिक शिक्षण ते विद्यापीठ शिक्षण अशी आधुनिक व्यवस्था सुरू केली. हे शिक्षण सर्वांना खुले होते. यात विज्ञान, गणित पाश्चात तत्त्वज्ञान व पाश्चात्य इतिहास यांचा समावेश होता. या शिक्षणात स्वतंत्र विचारांना वाव होता. म्हणून या शिक्षणाने समतेची व स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली. इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्य विचार भारतात लोकप्रिय होत राहिला. येथील अंधश्रद्धा कमी करण्यासाठी या समाजसुधारणा उपयोगी पडल्या. भारतात इंग्रजी शिक्षणामुळे निर्माण झालेला इंग्रजी विद्याविभूषितांचा नवा वर्ग व त्यातील प्रमुख व्यक्ती सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत अग्रभागी होत्या.

**शिक्षणाची सुरुवात :**

इ. स. १७८१ मध्ये कलकत्ता मदरसाची स्थापना करण्यात आली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्म प्रचारार्थ इंग्रजी भाषेतून शिक्षण देणारी इ. स. १७१७ मध्ये मद्रास येथे दोन शाळा उघडलीत. १७८४ मध्ये कलकत्ता येथे विल्यम जोन्स ह्यांने रॉयल एशियाटिक स्कूलची स्थापना केली. इ. स. १७९१ मध्ये इंग्रज रेसिडेंट जोनाथन डँकन यांच्या प्रयत्नांनी बनारस येथे संस्कृत महाविद्यालय स्थापन करण्यात आले. इ. स. १८०० मध्ये वेलस्लीने कंपनीच्या कर्मचाऱ्यांना भारतीय भाषा तसेच रीतीरिवाजांचे अध्ययन करण्यासाठी 'फोर्ट विल्यम कॉलेज' स्थापन केले. राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नांनी इ. स. १८१७ मध्ये कलकत्ता येथे हिंदू कॉलेज स्थापन करण्यात आले.

**मेकॉलेचा अहवाल :**

लॉर्ड बेंटिकने भारतीय लोकांना पाश्चिमात्य शिक्षण देण्याचे ठरविले व एक समिती स्थापन केले. त्या समितीचे प्रमुख पद त्याचा कायदेविषयक सदस्य मेकॉले याला दिले. २ फेब्रुवारी १८३५ रोजी मेकॉलेने आपला अहवाल सादर केला. मेकॉलेच्या मते भारतीय शिक्षण व ज्ञान विशेष महत्त्वाचे नाही. त्यामुळे त्याने पाश्चिमात्य शिक्षणावर भर देण्यात येऊन इंग्रजीचे समर्थन केले. त्यानुसार १८३५ मध्येच कलकत्ता येथे मेडिकल कॉलेज उघडण्यात आले. मेकॉलेच्या योजनेनुसार भारतातील प्रसिद्ध शहरांमध्ये हायस्कूल व कॉलेजेस उघडण्यात आले.

इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांच्या राहणीमान, खाणेपिणे, साहित्य, तत्त्वज्ञान इत्यादी विविध पैलूंवर इंग्रजी संस्कृतीचा प्रभाव पडू लागला. कायद्यासमोर सर्व समान हे तत्त्व लागू करण्यात आली येऊन इंग्रजांनी सर्वत्र एकसमान कायदा लागू केला व शिक्षणाचे सार्वत्रिकरण केल्या गेले.

**वुडचा अहवाल (१८५४) :**

लॉर्ड बेंटिकने मेकॉलेच्या हवालानुसार शिक्षण सुधारणा करणे सुरू केले. परंतु त्यांच्यानंतर आलेल्या गव्हर्नर जनरलने शिक्षण क्षेत्रात कोणतेच कार्य केले नाही. मात्र डलहौसीने शिक्षणाकडे लक्ष देऊन या लक्ष देऊन या विभागात बऱ्याच सुधारणा केल्या. शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करण्यावर त्याने भर दिला. त्यासाठी त्याने सर चार्लस वुडच्या नेतृत्वात एक कमिशन नेमले. त्या कमिशनने जो अहवाल सादर केला. तो वुडचा खलिता या नावाने प्रसिद्ध आहे. या अहवालानुसार डलहौसीने शिक्षण क्षेत्रात पुढील सुधारणा केल्या.

१) मुंबई, कलकत्ता, मद्रास प्रेसिडेंसीमध्ये विद्यापीठ स्थापन केले.
२) इंटर व डिग्रीच्या वर्गासाठी विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालय उघडण्यात आले.
३) प्राथमिक व माध्यमिक विद्यालय उघडण्यात आले.
४) शाळांमधील शिक्षणाचे माध्यम प्रांतिक भाषा निश्चित करण्यात आले.
५) स्त्री शिक्षणासाठी काही संस्थांची निर्मिती करण्यात आली.
६) व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी विद्यालयाची स्थापना करण्यात आली.
७) सरकारी अनुदान प्राप्त विद्यालये धर्मनिरपेक्ष तत्त्वावर चालवण्यात आली.
८) प्रत्येक प्रांतात एक लोकशिक्षण विभाग स्थापन केला.
९) सर्व शिक्षण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण संचालकाची नियुक्ती करण्यात आली.
१०) उच्चशिक्षणासाठी इंग्रजी भाषा हे माध्यम ठरविण्यात आले.

**हंटर कमिशन :**

वुडच्या शिफारशीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी रिपनने इ. स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. कारण वुडच्या शिफारशीनुसार भारतात शिक्षण दिल्या जात नाही. प्राथमिक शिक्षणापेक्षा उच्च शिक्षणावर अधिक खर्च करण्यात येते. अशाप्रकारची आरडाओरड ख्रिश्चन मिशनरी करू लागले होते. म्हणून शिक्षण क्षेत्रात खरोखरच दोष निर्माण झाले आहेत काय? शिक्षण क्षेत्रातील प्रगती कुठवर झाली आहे याचा आढावा घेण्याची जबाबदारी हंटर समितीवर टाकण्यात आली. या समितीने संपूर्ण देशाचा दौरा करून आपला अहवाल सरकारला सादर केला. त्याच्या शिफारशी खालीलप्रमाणे होत्या.

१) प्राथमिक शिक्षणावर भर देण्यात यावा व सर्वत्र लागू करावे. त्यासाठी प्रांतांनी राजस्वाचा काही भाग खर्च करावा.
२) शिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.
३) माध्यमिक शिक्षण खाजगी संस्थांकडे सोपविण्यात आले व त्यांना कार्य करण्यासाठी सरकारने अनुदान द्यावे.
४) उच्च शिक्षणाच्या बाबतीत सरकारने ढवळाढवळ करू नये. उच्च शिक्षण महाविद्यालये चालविण्यास भारतीयांनी पुढाकार घ्यावा व त्यांना सरकारने अनुदान द्यावे व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी.

५) औद्योगिक व व्यापारी प्रशिक्षण देण्यात यावे. शारीरिक व नैतिक शिक्षणावर भर देण्यात यावा.

६) मुसलमानांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यात यावे.

७) युरोपात शिक्षण घेऊन पदवीधर झालेल्या भारतीयांची महाविद्यालयांमध्ये नियुक्ती करण्यात यावी.

८) माध्यमिक शिक्षणात वाङ्मयीन व शास्त्राध्ययन, तांत्रिक व औद्योगिक शिक्षण देण्यात यावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भावी जीवनात आपला व्यवसाय निवडता येईल.

हंटर कमिशनने केलेल्या वरील सर्व शिफारशी रिपनने स्वीकारल्या व त्यांची अंमलबजावणी केली. १८८२ मध्ये पंजाब व अलाहबादमध्ये विद्यापीठ स्थापन केलीत.

**कर्झनचे शिक्षणविषयक धोरण :**

इ. स. १९०१ मध्ये कर्झनने सरकारी अधिकाऱ्यांची एक परिषद शिमला येथे भारविली. शिमला परिषदेच्या कामकाजाबद्दल अत्यंत गुप्तता बाळगण्यात आली. ह्या परिषदेत जे निर्णय घेण्यात आले, त्यानुसार १९०२ मध्ये कार्यकारी मंडळाच्या विधी सदस्य सर टॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली एक विद्यापीठ समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने पाच महिने विचार विनिमय केला व जून १९०२ मध्ये आपला अहवाल तयार करून सादर केला. समितीवर आधारित १९०४ मध्ये विश्वविद्यालयीन कायदा तयार करण्यात आला. त्याच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

१) उत्तम अध्यापकांची विश्वविद्यालयाने नियुक्ती करावी.

२) शैक्षणिक संस्थांचे सूक्ष्म निरीक्षण होणे आवश्यक आहे.

३) परीक्षांचा अभ्यासक्रम ठरविण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आला.

४) शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात आले. महाविद्यालयांना विद्यापीठांची संलग्नित करण्यात आले.

५) विद्यापीठाची प्रादेशिक सीमा निश्चित करण्यात आली. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळात सिनेटचे ५० ते १०० सदस्य असावेत यांची तरतूद केली.

६) प्राथमिक शिक्षणाचे माध्यम देशी भाषा ठेवले.

७) अध्यापकांसाठी ट्रेनिंग सेंटर उघडले गेले.

८) औद्योगिक शिक्षण व तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले.

१९२१ ते १९३७ मध्ये दिल्ली, नागपूर, आंध्र, आग्रा, मद्रास या ठिकाणी विद्यापीठ स्थापन केले. १९२५ मध्ये जामिया - मिलिया अलिगड विद्यापीठ दिल्लीस स्थानांतरित करण्यात आले.

**हार्टोग शिक्षण आयोग :**

शाळा महाविद्यालयाची अधिक प्रमाणात निर्मिती झाल्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली. पण पैश्या अभावी त्यात सुधारणा न झाल्याने शिक्षणाचा दर्जा घसरला. तो सुधारावा म्हणून १९२९ मध्ये सर फिलिप हार्टोग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने पुढील शिफारशी केल्या.

१) प्राथमिक शिक्षण अधिक विस्तृत करावे. शिक्षणात सुधारणा कराव्या व त्याचा दर्जा वाढवावा.

२) ८ वा वर्ग पास झाल्यावर त्या विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन व योग्यता पाहून त्याला व्यावसायिक शिक्षण

द्यावे.

३) हायस्कूल आणि त्याही पुढील शिक्षण केवळ योग्य पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात यावे.

४) विद्यापीठ शिक्षण देखील योग्य विद्यार्थ्यां पुरते मर्यादित असावे.

**सार्जेंट शिक्षण आयोग :**

इ. स. १९४४ मध्ये भारतीय शिक्षण विभागाचे सेक्रेटरी सर जॉन सार्जंट यांनी शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत शिफारशी केल्या, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) ६ ते ११ वर्षाच्या मुलांसाठी मोठ्या प्रमाणात प्राथमिक शाळा उघडण्यात याव्यात. हे शिक्षण निशुल्क राहील. तसेच सर्वांना शिक्षण अनिवार्य असावे.

२) ११ ते १७ वर्षाच्या मुलासाठी ६ वर्षीय वरिष्ठ शाळा उघडण्यात आल्या. ही विद्यालये दोन प्रकारची होती. – अ) विद्याविषयक, ब) तंत्र व व्यावसायिक विद्यालये, क) इंटरमिजिएट शिक्षण समाज करावे. वरिष्ठ शाळांचे शिक्षण एक वर्ष अधिक वाढविण्यात आले.

**राधाकृष्णन आयोग :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारने डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोगाची स्थापना केली. हे आयोग शिक्षणासंबंधी सल्ला देणारे होते. इ. स. १९४९ मध्ये आयोगाने खालील शिफारशी केल्या.

१) माध्यमिक शिक्षणाचा अध्ययन काळ १२ वर्षाचा असावा.

२) परीक्षांचे दिवस वजा करता विद्यापीठांमध्ये कमीत कमी १८० दिवस शिकविण्यासाठी असावेत. १८० दिवस तीन सत्रामध्ये विभागून प्रत्येक सत्र ११ आठवड्याचे असावे.

३) शिक्षणाचे तीन प्रकार होते. – अ) सामान्य शिक्षण, ब) संस्कार शिक्षण, क) व्यावसायिक शिक्षण – शेती, अभियांत्रिकी, चिकित्सा, कायदा, वाणिज्य, औषधीशास्त्र इत्यादी.

४) प्रशासकीय सेवांसाठी विद्यापीठाची स्थानिक ही पदवी अनिवार्य मांनण्यात येऊ नये.

५) स्नातक पदवी मिळविण्यासाठी तीन वर्षाचा अभ्यासक्रम असावा. ती परीक्षा एकदम शेवटी न घेता प्रत्येक वर्षी घेण्यात यावी.

६) विद्यापीठीय शिक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात यावी.

राधाकृष्णन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार १९५३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली. याच वर्षी संसदेमध्ये एक कायदा पास करण्यात आला.

**पाश्चिमात्य शिक्षणाचा परिणाम :**

१) इंग्रजी भाषेतील शिक्षणामुळे प्रशासनात एकच भाषा आल्यामुळे देशातील कानाकोपऱ्यातील माणसे एकत्र आली. त्यांच्या बोलभाषा वेगवेगळ्या असल्या तरी संभाषणाचे माध्यम मात्र एकच इंग्रजी भाषा राहिली.

२) पाश्चिमात्य संस्कृतीचे भारतीयांना ज्ञान झाल्यामुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचे वारे वाहू लागले.

३) इंग्लंड मधील उदारवादाने प्रभावित होऊन भारतातही लोकशाहीचा पुरस्कार करणारा वर्ग निर्माण झाला.

४) भारतीयांना प्रशासकीय सेवांमध्ये बाधा निर्माण केल्याने सुशिक्षित भारतीयांमध्ये इंग्रजांविषयी असंतोष निर्माण झाला.

५) भारतीयांमध्ये जुन्या रूढी, अनिष्ट प्रथा, परंपरा इत्यादी त्याग करून नवसमाज निर्माण करण्याची वृत्ती निर्माण झाली.

६) प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगून सुशिक्षित वर्गाने तिच्या प्रसारार्थ कार्य केले.

७) शिक्षणाने व्यापक दृष्टी आल्यावर समाज प्रबोधनाला प्रारंभ झाला.

८) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक व धार्मिक प्रबोधन सुरू झाल्याने स्त्रियांच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला व त्यांच्या वरील कुप्रथा व रुढी परंपराचा विरोध करण्यात आला. त्यांच्या शिक्षणासाठी शाळा उघडण्यात आल्या.

९) १८७६ मध्ये कलकत्ता येथे महेंद्रलाल सरकार यांनी 'इंडियन कौसिल ऑफ सायंटिफिक स्टॅडीज'ची स्थापना केली. त्यामुळेच जगदीशचंद्र बोस यांना भौतिकविज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करण्याची संधी मिळाली व त्यांनी १८९७ मध्ये वनस्पतींही जीव असतो हा शोध लावला.

**निष्कर्ष :**

इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय लोकांतही साहित्य निर्माण होऊ लागले व या साहित्याचा उपयोग सुधारणा व राष्ट्रीय जागृतीसाठी होऊ लागला. त्याचा परिणाम म्हणून इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. तसेच इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाल्यामुळे भारतीयांना एकमेकांचे विचार समजू लागले. विचाराचे आदानप्रदान होऊ लागले. भारतीयांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचे कार्य इंग्रजी शिक्षणाने केले.

**संदर्भग्रंथ :**


- गोपाल एस., 'ब्रिटिशांची भारतातील राजनीती', डायमंड पब्लिकेशन, २००६.
- डॉ. खन्ना कैलास, 'आधुनिक भारत का सामाजिक इतिहास', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००७.
- डॉ. रॉय सत्य एम., 'भारत में उपनिवेशवाद और राष्ट्रवाद', हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १९८३.
- Chandra Bipin, 'Nationalism and Colonialism in Modern India', Orient Blackswan, 1979.
- डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास : १९२० – १९४७', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९४.
- धवन एस. एल., 'भारत में राष्ट्रीय आंदोलन का उद्भव एवं विकास', अर्जुन पब्लिसिंग हाऊस, नई दिल्ली, २००३.
- पाठक रश्मी, 'भारत में अंग्रेजी राज', अर्जुन पब्लिसिंग हाऊस, नई दिल्ली, २००३.